राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अनुदान वितरित करण्यास मंजूरी देण्याबाबत सन २०१७-१८

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: ग्राक्षेवि - २०१८ / प्र.क्र. २३ /का.९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १५ मार्च, २०१८.

वाचा -

१) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१५/प्र.क्र.७७/ का.९, दि.२२ सप्टेंबर, २०१५.
२) शासन पूरकपत्र,अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१५/प्र.क्र.६/का.९, दि. ९ मार्च, २०१६.
३) शासन परिपत्रक , वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७
४) शासन परिपत्रक , वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३,दि. ३० जून, २०१७
५) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१७ /प्र.क्र.५६/ का.९, दि.२० एप्रिल, २०१७.
६) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१७ /प्र.क्र.१०१/ का.९, दि.११ डिसेंबर, २०१७.
७) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दि.०६ फेब्रुवारी,२०१८
८) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१७ /प्र.क्र. ०७/ का.९, दि.०६ मार्च २०१८

प्रस्तावना :-

राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत/ पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्याक लोकसमुहातील नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ या वर्षासाठी ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. २ येथील शासन पूरकपत्रान्वये, दि. २२ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील योजनेची कार्यपध्दती या शीर्षाखाली परिच्छेद (क) (iii) च्या पुढे परिच्छेद दाखल करण्याचा निर्णय शासन मान्यतेने घेतला आहे. त्यानुसार मा. खासदार व आमदार तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडून शासन मान्यतेसाठी प्राप्त ग्रामपंचायत प्रस्तावांना मंजूरी देऊन निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ करिता रु.३५,५०,००,०००/- (अक्षरी रू. पस्तीस कोटी पन्नास लक्ष फक्त) एवढा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. संदर्भ क्र. ३ व ४ येथील शासन परिपत्रकान्वये सन २०१७-१८ मध्ये प्रथम नऊ महिन्यांकरिता (डिसेंबर, २०१७ अखेर) अर्थसंकल्पित निधीच्या ७० टक्के निधी वितरणास तसेच संदर्भ क्र. ७ अन्वये सन २०१७-१८ मधील अर्थसंकल्पित निधीच्या एकूण वार्षिक तरतूदीच्या (पुरवणी मागण्यांसह) महसूली ७०% व भांडवली ८०% च्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज वितरण प्रणालीवर (बीम्स) वितरीत करण्यास सहमती देण्यात आली आहे. त्यानुसार रु. २८,४०,००,०००/-(अक्षरी एकूण रुपये अठ्ठावीस कोटी चाळीस लक्ष फक्त) इतका निधी उपलब्ध झाला असून त्यापैकी संदर्भ क्र. ५, ६आणि ८ अन्वये एकूण रु.१९,८८,००,०००/- (अक्षरी एकूण रुपये एकोणीस कोटी अठ्ठयाऐंशी लक्ष फक्त) इतका निधी वितरित करण्यात आला आहे. उर्वरित रु.८,५२,००,०००/- (अक्षरी एकूण रुपये आठ कोटी बावन लक्ष फक्त) इतका निधी मार्च, २०१८ अखेर पर्यंत वितरणास उपलब्ध आहे. त्यापैकी मा. खासदार व आमदार तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडून शासनास प्राप्त झालेल्या ग्रामपंचायतींचे प्रस्तावानां शासन मान्यता मिळाली असून या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट -"अ"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण१७ जिल्ह्यातील अल्पसंख्यांक बहुल ग्रामपंचायतींना मुलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एकूण **रु.६,६४,००,०००/- (अक्षरी एकूण रुपये सहा कोटी चौसष्ट लक्ष फक्त)** इतके अनुदान मंजूर करण्यात येत असून हे अनुदान संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचेमार्फत संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्वाधीन करण्यात येत आहे.

२. संबंधित अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना मंजूर करण्यात आलेले अनुदान वितरित करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी, नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. **परिशिष्ट "अ"** मध्ये दर्शविलेली कामे इतर योजनेतून करण्यात आलेली नाहीत, याची शहानिशा व खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी व जर सदर काम इतर योजनेतून मंजूर केले असल्यास त्या बदल्यात इतर काम मंजूर निधीच्या मर्यादेत राहून बदल करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना राहतील. उपरोक्त कामाच्या बदल्यात इतर काम करणे शक्य नसल्यास त्यासाठी वितरीत केलेला निधी शासन जमा करण्यात यावा. तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडून प्राप्त करून घ्यावे. याबाबतची सर्व कागदपत्रे शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार प्राप्त करून घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी. त्यानंतर त्यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात यावी व निधी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सुपूर्द करण्यात यावा.

३. ज्या विवक्षीत प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे, केवळ त्याच प्रयोजनासाठी संबंधित ग्रामपंचायतींनी निधी खर्ची टाकणे अनिवार्य आहे. संबंधित जिल्हाधिकारी /मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांच्याकडून अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर ग्रामपंचायतींनी प्रस्तावात नमूद केलेली कामे पूर्ण करणे आवश्यक आहे व याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे या शासन निर्णयाच्या **परिशिष्ट - ब** मध्ये विहित केलेल्या नमुन्यात अल्पसंख्याक विकास विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील संबंधित अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींनी हाती घेतलेल्या विकासकामांच्या प्रगतीबाबत संनियंत्रण करुन त्याबाबतचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर करावा.

४. या योजनेंतर्गत होणारा खर्च "मागणी क्र. झेड ई-१, २२३५ -सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण,१९८-ग्रामपंचायतींना सहाय्य, राज्य योजनांतर्गत योजना, ०१ अल्पसंख्याकांना सहाय्य,(०१) (०१) अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना सहायक अनुदान (२२३५ बी ०८५)" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

५. "सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि. १७ एप्रिल,२०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल,२०१७, क्र. अर्थसं-२०१७/प्र. क्र. ९४/ अर्थ-३, दि. ३० जून, २०१७ आणि क्र. अर्थसं- २०१७/ प्र. क्र. ७५/ अर्थ-३, दि.०६फेब्रुवारी,२०१८रोजीच्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामधील मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. "

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३१५१७०८१२२७१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.03.16 10:14:59 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,

२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मंबई,

३) मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (अवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

४) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र शासन,

५) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,

६) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,

७) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई

८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

१०) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,

११) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)

१२) अर्थसंकल्प शाखा (का.७), अविवि, मंत्रालय, मुंबई,

१३) निवडनस्ती (कार्यासन-९)

शासन निर्णय ,अल्पसंख्याक विकास विभाग क्रमांक : ग्राक्षेवि - २०१८/ प्र.क्र.२३ /का.९,
दिनांक:- १५ मार्च, २०१८.
परिशिष्ट - "अ"

अ. क्र.	जिल्हा	तालुका	ग्रांमपंचायतींचे नांव	विषय	मंजूर निधी (रुपये)
१	**बीड**	बीड	मौ.पिपंळनेर	१) मुस्लिम कब्रस्थान संरक्षण भिंत बांधकाम करण्यासाठी.	१० लक्ष
		गेवराई	मौ.सिरसदेवी	२) मुस्लिम कब्रस्थान संरक्षण भिंत बांधकाम करण्यासाठी.	१० लक्ष
				जिल्हा बीड	**२० लक्ष**
२	**जळगांव**	चाळीसगाव	मेहूनबारे	१) रस्त्याचे कॉंक्रीटीकरण गटार बांधणे	१० लक्ष
			पिलखोड	२) शादीखाना कब्रस्तानाला संरक्षण भित बांधणे.	१० लक्ष
			लोंजे	३) रस्त्याचे कॉंक्रीटीकरण व गटार बांधणे.	१० लक्ष
				जिल्हा जळगाव	**३० लक्ष**
३	**नांदेड**	मुखेड	चोंडी	१) शादीखाना बांधकाम करणे.	१० लक्ष
			बेटमोगरा	२) ईदगाह संरक्षण भिंत बांधकाम करण्यासाठी.	१० लक्ष
			दापका(राजा)	३)ईदगाह संरक्षण भिंत बांधणे.	१० लक्ष
				जिल्हा नांदेड	**३० लक्ष**
४	**हिंगोली**	सेनगांव	कोळसा	१) अल्पसंख्यांक वस्तीत शादीखाना बांधकाम करण्यासाठी.	१० लक्ष
				जिल्हा हिंगोली	**१० लक्ष**
५	**अकोला**	अकोट	चोहट्टा बाजार	१) अल्पसंख्यांक वस्तीतील रस्त्याचे बांधकाम व कॉंक्रीटीकरण करणे,गटारे तसेच विद्युत पोलसह एलईडी लाईट लावणे.	१५ लक्ष
			रेल	२) अल्पसंख्यांक वस्तीतील रस्त्याचे बांधकाम व कॉंक्रीटीकरण करणे,गटार तसेच विद्युत पोलसह एलईडी लाईट लावणे.	१५ लक्ष
				जिल्हा अकोला	**३० लक्ष**
६	**वर्धा**	वर्धा	बोरगांव(मेघे)	१) सिमेंट रस्ता बांधकाम करणे.	१० लक्ष
		वर्धा	म्हसाळा	२) सिमेंट रस्ता बांधकाम करणे	१० लक्ष
		सेलू	हिंगणी	३) कब्रस्तान बांधकाम करण्यासाठी.	१० लक्ष
		आर्वी	मौ.रसुलाबाद	१) मुस्लीम वाडीत रस्ता मंजुर करुन नाली बांधकाम करणे	१० लक्ष
				२) शादीखाना बांधकामकरिता.	१० लक्ष
				जिल्हा वर्धा	**५० लक्ष**

७	**चंद्रपूर**	चंद्रपूर	घुग्घुस	१) ख्रिश्चन स्मशानभूमीस बसण्याकरीता डेक्स तसेच शेड बांधणे.	१५ लक्ष
				२) मुस्लिम स्मशानभूमीत बसण्याकरीता डेक्स तसेच शेड बांधणे.	१५ लक्ष
		चिमूर	खडसंगी	१)कब्रस्थानचे संरक्षण भितीचे बांधकाम	१० लक्ष
			मासळ	२) मुस्लीम कब्रस्थानचे सरंक्षण भितीचे बांधकाम करणे	१० लक्ष
			पळसगांव(पि)	३)मुस्लीम कब्रस्थानचे संरक्षण भितीचे बांधकाम करणे	१० लक्ष
				जिल्हा चंद्रपूर	**६० लक्ष**
८	**कोल्हापूर**	हातकणंगले	मौ.कबनुर	१)आझाद नगर,(मराठी शाळेजवळील) रस्ते करणे.	१५ लक्ष
				२) सिध्दार्थ नगर,(मराठी शाळेजवळील) रस्ते करणे	१५ लक्ष
		करवीर	गडमुडशिंगी	१)रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे	१० लक्ष
			कणेरी	२) रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे	१० लक्ष
			निगवे खा.	३) अल्पसंख्यांक वस्ती मध्ये रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे	१० लक्ष
				जिल्हा कोल्हापूर	**६० लक्ष**
९	**अहमदनगर**	नेवासा	चांदा	१) मुस्लीम समाजासाठी शादीखाना बांधकाम करणे	२० लक्ष
			देडगांव	२) खिश्चन समाजासाठी कम्युनिटी हॉल बांधणे.	१० लक्ष
				जिल्हा अहमदनगर	**३० लक्ष**
१०	**भंडारा**	तुमसर	मौ.चिखला	१)चिखला वस्ती मस्जीद जवळ समाज मंदीर बांधण्यासाठी	०५ लक्ष
			मौ.सितासावंगी	२) मुस्लीम कब्रस्थान सुरक्षा भिंत (कंम्पाऊड वॉल) बांधणे.	०५ लक्ष
			मौजा नाकाडोंगरी	३) कब्रस्तान सुरक्षा भिंत (कंम्पाऊंड वॉल) बांधणे	०५ लक्ष
			मौजा स्टेशन टोली (देव्हाडी)	४) मुस्लीम कब्रस्थान (कंपाऊंड वॉल) बांधणे.	०५ लक्ष
				५) मुस्लीम कब्रस्थान अंतर्गत रस्ते सिंमेट कॉंक्रीट करणे.	०५ लक्ष
			मौजा करडी	६) मुस्लीम कब्रस्थानला सुरक्षा भिंत (कम्पांऊड वॉल) बांधणे.	०५ लक्ष
				जिल्हा भंडारा	**३० लक्ष**

११	**पुणे**	शिरुर	मौ.न्हावरे	१) मुस्लीम दफनभूमी आवारात सामाजिक सभागृह बांधणे	०७ लक्ष
			मौ.न्हावरे	२) मुस्लीम दफनभूमीस संरक्षक भिंत बांधणे	०८ लक्ष
			मौ.वडगाव रासाई	३) मुस्लीम दफनभूमीस संरक्षक भिंत व सुधारणा करणे	१० लक्ष
			मौ.गोलेगाव	४) मुस्लीम दावन मलिक मध्ये पाण्याची टाकी बांधणे	०५ लक्ष
		मावळ	वडगाव	१) मुस्लिम दफनभूमी येथे वॉल कंपाऊड भिंत बांधणे व बंदिस्त गटार बांधणे	१५ लक्ष
			इंदोरी	२) मुस्लिम दफनभुमी येथे वॉल कंपाऊंड भिंत बांधणे व बंदिस्त गटार बांधणे	१५ लक्ष
		हवेली	कोढवे-धावडे	१)खडकवासला ग्रामीण भागांतर्गत कोढवे-धावडे येथील मुस्लिम बहुल भागात अंतर्गत रस्ते व गल्लीबोळ कॉंक्रीटीकरण करणे	१५ लक्ष
		हवेली	वरदडे	२)खडकवासला ग्रामीण भांगातर्गत वरदडे येथील मुस्लिम बहुल भागात अंतर्गत रस्ते व गल्लीबोळ कॉंक्रीटीकरण करणे.	१५ लक्ष
				जिल्हा पुणे	**९० लक्ष**
१२	**सांगली**	मिरज	मौ.आरग	१)जैन वस्ती समोरील मोकळया जागेत सभामंडप बांधणे	१० लक्ष
				२) मुस्लीम दर्गा संरक्षण भिंत,मकानदार मोहल्ला रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.	१० लक्ष
			मौ.मालगाव	३) जैन वस्ती समोरील मोकळया जागेत सभामंडप बांधणे	१० लक्ष
		कडेगांव	मौजे नेवरी	ईदगाह मैदान वरती वॉल कंपाऊंड,पेव्हीग ब्लॉक बसविणे व ईदगाह भिंतीचे बांधकाम करणे.	१० लक्ष
				जिल्हा सांगली	**४० लक्ष**
१३	**गडचिरोली**	वडसा	मौ.पोटगांव	१) कब्रस्थानला संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे.	०५ लक्ष
				२) कब्रस्थानला सिंमेट कॉंक्रीट रस्ता बांधकाम करणे.	०५ लक्ष
			मौ.विसोरा	३) कब्रस्थान संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे.	०५ लक्ष

		आरमोरी	मौ.डोंगरगांव	४) श्री.अभिजित सिंग ते श्री रदवा यांचे घरापर्यंत सिमेट कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे.	०५ लक्ष
		कोरची	मौ.बेतकाठी	५) श्री. करीम शेख ते श्री.हकीम शेख यांचे घरापर्यत सिमेट कॉंक्रीट रस्ता व नाली सिमेट कॉंक्रिट रस्ता व नाली बांधकाम करणे.	०५ लक्ष
				जिल्हा गडचिरोली	**२५ लक्ष**
१४	**यवतमाळ**	दारव्हा	पळशी	१) शादीखाना बांधकाम करणे.	१० लक्ष
		दिग्रस	लाख रायाजी	२) शादीखाना बांधकाम करणे.	१० लक्ष
				जिल्हा यवतमाळ	**२० लक्ष**
१५	**सिंधुदुर्ग**	वैभववाडी	उंबर्डे	१) उंबर्डे मुख्य रस्ता ते पाकीजावाडी रस्ता डांबरीकरण नुतनीकरण करणे.	०५ लक्ष
				२) उंबर्डे रमदुलवाडी येथील रस्त्याला संरक्षण भिंत बांधणे	०३ लक्ष
				३)उंबर्डे बोबडेवाडी येथील मौलवी यांच्या घराजवळ संरक्षण भिंत बांधणे	०६ लक्ष
		कणकवली	ग्रा.पं. खारेपाटण	१) ग्रा.पं.खारेपाटण मुंबई -गोवा हायवे नं.६६ ते काझीवाडी रस्त्याला संरक्षण भिंत बांधणे.	१० लक्ष
				२) ग्रा.पं.खारेपाटण खारे.काझीवाडी कब्रस्थान मध्ये कब्रस्थान शेड बांधणे	१५ लक्ष
				जिल्हा सिंधुदुर्ग	**३९ लक्ष**
१६	**रत्नागिरी**	रत्नागिरी	ग्रा.पं. कोतवडे	१) मुस्लिम मोहल्ला येथे पिण्याची विहीर बांधणे.	१० लक्ष
			ग्रा.पं.उसी	२) कब्रस्थानाला कंपाऊंड वॉल बांधणे	१० लक्ष
			ग्रा.पं.नेवरे	३) मुस्लिम मोहल्ला येथे पिण्याच्या पाण्याची विहरी बांधणे	१० लक्ष
			ग्रा.पं.निवेंडी	४)ग्रा.पं.निवेडी घरकुल बौध्दवाडीकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे	१० लक्ष
				जिल्हा रत्नागिरी	**४० लक्ष**
१७	**धुळे**	धुळे	मौजे नगाव (तिसगाव)	१)मुस्लीम वस्ती येथे श्री.हरिश रुबाब पिंजारी यांच्या घरापासून ते श्री.जाकीर हुसेन पिंजारी यांच्या घरापर्यत कॉंक्रीट रस्ता तयार करणे.	१० लक्ष
			मौजे नगाव	२)मुस्लीम वस्ती येथे श्री.भाईमिया भावडू पिंजारी यांच्या घरापासून ते श्री.पिरण बशिर पिंजारी यांच्या घरापर्यत कॉंक्रीट रस्ता तयार करणे.	१० लक्ष

			नेर	३)मुस्लीम समाजासाठी समाज भवन बांधणे	१० लक्ष
			नरडाणा	४)मुस्लीम समाजासाठी समाज भवन बांधणे	१० लक्ष
		साक्री	मौजे इंदवे	५)बौध्द वस्ती येथे श्री.गुलाब सुका पानपाटील ते मुख्य रस्त्यापर्यत कॉंक्रीट रस्ता करणे.	१० लक्ष
			मौजे दाततीं	६)जैन वस्ती येथे श्री.भिकचंद खेमचंद टाटीया यांच्या घरापासून ते श्री.हेमंत शिवलाल शर्मा यांच्या घरापर्यत कॉंक्रीट रस्ता करणे.	१० लक्ष
				जिल्हा धुळे	**६० लक्ष**
				एकूण रुपये	**६,६४,००,०००/-**
				(अक्षरी एकूण रूपये सहा कोटी चौसष्ट लक्ष फक्त)	

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.03.16 10:15:23 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. ग्राक्षेवि - २०१७/प्र.क्र. २३ /का.९,
दि. १५ मार्च , २०१८.

परिशिष्ट - "ब"

उपयोगिता प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, अल्पसंख्याक विकास विभागाने राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यान्वित केलेल्या क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. **ग्राक्षेवि २०१७/ प्र.क्र. २३ /का.९, दि. १५ मार्च, २०१८** अन्वये वितरित केलेला रु. /- (अक्षरी रु.) एवढा निधी पुढील विकासकामांसाठी उपयोगात आणला आहे :-

विकासकाम/ विकासकामे	वापरलेली रक्कम
अ.	रु.
ब.	रु.
क.	रु.
ड.	रु.

असेही प्रमाणित करण्यात येते की, क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत ज्या निकष/ अटींनुसार शासनाने अनुदान मंजूर केले होते, त्या निकष/ अटींची यथायोग्यरित्या पुर्तता करण्यात आली आहे. तसेच ज्या प्रयोजनाकरिता निधी मंजूर करण्यात आला होता, त्याच प्रयोजनाकरिता निधिचा प्रत्यक्षात विनियोग झाला आहे, याची खातरजमा करण्याकरिता मी खालील दस्तऐवज/अभिलेखांची तपासणी केली आहे :-

तपासणी केलेल्या दस्तऐवज/अभिलेखांचे प्रकार :-

१. प्रमाणक आणि पुस्तक लेखा (Vouchers and Book of Accounts)
२. मोजणी पुस्तके (Measurement Books)
३. सहायक अनुदान / कर्ज नोंदवही (Grant-in-aid/ Loan Register)
४. खर्च नोंदवही (Expenditure Register)

ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक, संबंधित ग्रामपंचायत यांची स्वाक्षरी	मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांची प्रतिस्वाक्षरी
नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा	नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा

*****